CMYK

आरोग्य विशेष... >>पान 2

महायुतीच्या विजयाच्या धसक्याने मौलाना नोमानींनी मागितली जाहीर माफी >>पान 3

राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या आयुर्वेद निसर्ग चाचणीने प्रकृती परिक्षण अभियानाला देशात सुरुवात ! >>पान 4

**सुविचार**

इच्छाशक्तीनेच महान कार्ये घडतात.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



गेल्या १० वर्षात कधी ३५० तर कधी २५० कोटी छापले, या ५ चित्रपटांनी अल्लू अर्जुनला बनवले सुपरस्टार

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 107 ■ बुधवार, दि. 27 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# महाविकास आघाडीचे आता 'मिशन ईव्हीएम'


## शरद पवार, उद्धव ठाकरे मैदानात; वकिलांची फौज तयार, पदाधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर आता महाविकास आघाडीतील पक्षाचे प्रमुख नेतेही ईव्हीएमविरोधातील (ईव्हीएम) भूमिकेवर एकमताने पुढे जात असल्याचे पाहायला मिळत आहे. कारण, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पराभूत आमदारांची आज मुंबईत बैठक झाली. या बैठकीत पराभूत आमदारांनी निकालावर संशय व्यक्त करत ईव्हीएमच्या आकडेवारीवर आणि टक्केवारीवर संशय व्यक्त केला आहे.**

त्यानंतर, पक्षप्रमुखांनी देखील ही बाब गांभीर्याने घेत ईव्हीएमविरोधात ठोस भूमिका घेण्याचं ठरवलं आह. त्यामुळे, ईव्हीएम विरोधातील लढाईसाठी विरोधकांच्या आक्रमक भूमिकेला सुरुवात झाल्याचं पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड हे १ लाखांच्या मताधिक्याने विजयी झाले असूनही त्यांनी ईव्हीएमला प्रकर्षणाने विरोध दर्शवला. तर, शरद पवार आणि उद्धव ठकारेंनीही मोठं आंदोलन उभं करण्याचं आवाहन केलंय.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत



उमेदवारांनी केलेल्या तक्रारी संदर्भात एक वकिलांची टीम करण्याचा निर्णय पक्षाचे प्रमुख शरद पवारांनी घेतला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून राज्यपातळीवर एक आणि केंद्रीय पातळीवर एक कायदेशीर लढाई लढण्यासाठी वकिलांची टीम गठित करण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. शरद पवारांकडून केवळ >>पान ३

# शिवसेना आक्रमक, भाजपचे सावध पाऊल; मुख्यमंत्रिपदाचा सस्पेन्स कायम



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पदाचा आज राजीनामा राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना सादर केला. मुख्यमंत्र्यांना पर्यायी व्यवस्था होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्र्यांचा कार्यभार सांभाळण्यास सांगण्यात आलं आहे. दरम्यान निकाल लागून चार दिवस उलटून गेले तरी अद्याप मुख्यमंत्रीपदाबाबत सस्पेंस कायम आहे. महायुतीने मोठं यश मिळवल्यानंतर तिन्ही पक्षांकडून मोठा जल्लोष केला गेला. लोकसभेतील अपयश भाजपनं या विधानसभेत भरुन काढत मोठं कमबॅक केलं. महायुतीला अपेक्षेपेक्षाही मोठं यश मिळाल्याने सत्तेच्या वाटेतील सर्व समीकरणं बदलली आहेत.

सोबत भाजपनं थेट बहुमतापर्यंत मजल मारल्याने मुख्यमंत्रीपदावर देखील दावा केला जात आहे. अशात या सत्तेच्या समीकरणासंदर्भात मांडणी पुन्हा नव्याने तिन्ही पक्षांना करावी लागणार आहे.

एकीकडे भाजपचे दिल्लीतील वरीष्ठ नेते देखील हिवाळी अधिवेशनात व्यस्त दिसत आहेत. यंदाच्या अधिवेशनात अनेक महत्त्वाची विधेयकं मांडली जाणार असल्याची माहिती आहे. भाजपला महाराष्ट्रात मिळालेलं यश मोठं आहे. अशात सत्तास्थापनेसंदर्भात विरोधकांची देखील दिल्लीतील नेत्यांची चिंता मिटल्याने भाजपकडून घाई न करता वेळ घेत असल्याची चर्चा आहे. सोबतच मुख्यमंत्रीपदासंदर्भात तिन्ही पक्षांसोबत दिल्लीतील नेते चर्चा करणार असल्याने कोणी नवा चेहरा दिला जातो का यासंदर्भात देखील तर्कवितर्क लावली जात आहेत.

सव्वाशेहून अधिक जागा जिंकल्याने भाजपचा मुख्यमंत्रीपदावर दावा आहे. दुसरीकडे मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात लढल्याने हे यश मिळाल्याचा दावा शिवसेना करत आहे. सोबतच शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावे म्हणून आक्रमक होत असताना यासंदर्भात सावध पाऊलं टाकली जात असल्याचं दिसतं.

सव्वादोनशेहून अधिक जागा जिंकत सत्तेत आलेल्या महायुतीचा मुख्यमंत्रिपदावरुन पेच कायम आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी निवड झाली असली तरी भाजपचा यासंदर्भात निर्णय होऊ शकलेला नाही. त्यामुळे जोपर्यंत दिल्लीतील नेत्यांकडून हालचाली होत नाहीत तोपर्यंत मुख्यमंत्री पदाबाबतचा निर्णय देखील होऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे दिल्लीतील नेते निर्णय कधी घेतात आणि मुख्यमंत्रिपदी कोणाची वर्णी लागते हे बघणं महत्त्वाचं असेल.

# सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय; याचिकाकर्त्याला चांगलंच झापलं

नवी दिल्ली : राज्यातील विधानसबभा निवडणुकांच्या निकालानंतर राजकीय वातावरण तापलं असून महायुतीकडून जल्लोष व आनंद व्यक्त केला जात असताना महाविकास आघाडीचे नेते पराभवाचं चिंतन करत आहेत. त्यातच, विजयी आमदारांची व पराभूत आमदारांची बैठक घेऊनही सूचना केल्या जात आहेत. पराभूत उमेदवारांकडून ईव्हीएमच्या घोळावर संशय व्यक्त होत असून आता शरद पवारांनीही ईव्हीएम संदर्भातील घोळावर कायदेशीर लढाई लढण्यासाठी समिती गठीत केली आहे. त्यानुसार, यंदाच्या निवडणूक निकालानंतर संशयास्पद वाटणारे सर्वते पुरावे गोळा करण्याचे आवाहनही उमेदवारांना केले आहे. दरम्यान, राज्यातील निकालानंतर ईव्हीएमवर शंका उपस्थित झाल्याने, ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे.



तसेच, याचिकाकर्त्यांना खडे बोलही सुनावले आहेत. विधानसभा निवडणुकानंतर दाखल >>पान ३

# निवडणूक संपताच रश्मी शुक्लांची पुन्हा पोलीस महासंचालकपदी नियुक्ती



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महायुतीचं सरकार सत्तेत येण्यापूर्वीच मोठा निर्णय घेण्यात आला आहे. रश्मी शुक्ला यांची पुन्हा एकदा राज्याच्या पोलीस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आज सकाळी रश्मी शुक्ला यांनी आपला पदभार स्वीकाला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने पदमुक्त केलं होतं. आता पुन्हा त्यांना सेवेत दाखल करून घेण्यात आलं आहे.

राज्यातल्या काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षनेत्यांचे फोन टॅपिंगचा आरोप असलेल्या रश्मी शुक्लांना निवडणुकीच्या काळात पदावरून हटवण्यात आलं होतं. काँग्रेसने केलेल्या तक्रारीनंतर निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला होता. त्यानंतर राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती केली होती. पण त्यांच्या नियुक्तीमध्ये तात्पुरती नियुक्ती असा शब्द वापरण्यात आला होता.

विधानसभा निवडणुकीचा निकाल महायुतीच्या बाजून आला असून राज्यात आता महायुतीचं सरकार येणार आहे. त्यामुळे निकाल लागल्यानंतर लगेचच रविवारी संध्याकाळी रश्मी शुक्ला यांनी देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली होती. त्यानंतर आता रश्मी शुक्लांची पुन्हा एकदा पोलिस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली.

# शरद पवार यांच्यासारख्या प्रगल्भ व्यक्तीने ईव्हीएमवर शंका घेणे योग्य नाही

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची पवारांवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शरद पवार या सारख्या प्रगल्भ व्यक्तीने निवडणुकीचा पराभव झाला म्हणून असे बोलले हे मला न पडणारे आहे. शरद पवार हे महाविकास आघाडीचे नेते आहेत. त्यांनी अशा पद्धतीचा ईव्हीएम वर विचार करणे योग्य नसून जेव्हा सुप्रिया सुळे बारामतीतून निवडून आल्या आणि सुनेत्रा पवार हरल्या तेव्हा का काही बोलले नाही, असा प्रश्न करून भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शरद पवार यांच्यावर टिका केली. ते मुंबई येथे माध्यमांशी बोलत होते.

यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की,२६ नोव्हेंबर १९४९ ला बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले आज संपूर्ण भारतात संविधान लागू केले.आज संविधान वाचन केले. संविधानाने जी जवाबदारी दिली आहे. त्याच्या समोर नतमस्तक होऊन वचन दिले.



पंतप्रधान मोदी यांनी संविधानसमोर नतमस्तक होऊन विकसित भारताचा संकल्प केला आहे. आज २६/११ आहे. संपूर्ण देशाला जगाला माहिती आहे,आपल्या जिवाची आहुती दिली. त्यांना आज श्रद्धांजली अर्पण केली. मुंबईवर हल्ला झाला होता तो महाराष्ट्रावर हल्ला झाला होता तो कोणी विसरू शकणार नाही,असे ते म्हणाले.

केंद्रीय नेतृत्व, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे यावर निर्णय घेत आहेत, मजबूत सरकार असणार आहे. त्यामुळे थोडा वेळ लागतो काहीतरी कल्पित बातम्या महाराष्ट्राला दाखवून कंफ्यूज करण्याचे काम काही माध्यमातून सुत्रांच्या नावाने केले जात आहे. महाराष्ट्राचे सरकार येणार सर्वांना न्याय देणारे सरकार येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राला कंफ्यूज करू नये,असे आवाहन त्यांनी केले. तर माध्यम प्रतिनिधींनी प्रश्न केला असता चंद्रशेखर बावनकुळे यांनी मी कुणालाही सल्ला देणार नाही. प्रत्येकाच्या कार्यकर्त्यांला वाटते आपल्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री व्हावा,महायुती टिकवण्यासाठी कुठलेही असे विधान योग्य नाही. केंद्रीय नेतृत्वाचा निर्णय झाला की, मग एकत्र राहील महाराष्ट्राच्या जनतेला जे आश्र्वासन दिले आहेत ते पूर्ण करायचे आहेत.असे सांगून त्यांनी कोण काय बोलतय त्याच उत्तर देण्याची माझी जबाबदारी नसल्याचेही त्यांनी सांगितले. तर संजय राऊत यांनी रश्मी शुल्कांवर वक्तव्य करीत आहेत. संजय राऊत ज्या पद्धतीने निवडणुकीचे निकाल आल्यापासून जे बोलत आहेत, ते फक्त आव आणून बोलत आहेत. त्यांना काहीतरी बोलायचे असते म्हणून ते बोलतात त्यांना माहिती आहे पाच वर्ष किती आटापीटा केला, तरी काही होणार नसल्याचे त्यांनी सांगितले.





# विरोधकांनी मोठ्या मनाने पराभव स्वीकारावा

## आ.प्रवीण दरेकर यांचा विरोधकांना सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाविकास आघाडी आता ईव्हीएमवर संशय घेत असून रडीचा डाव खेळताना खेळत आहे. आता विरोधकांनी मोठ्या मनाने पराभव स्वीकारावा, असा सल्ला भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे नेते आमदार प्रविण दरेकर यांनी विरोधकांना दिला. ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते. विरोधकांनी ईव्हीएमवर उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते बोलताना म्हणाले की, महाविकास आघाडीचा दारून पराभव झाला आहे. त्यामुळे ते रडीचा खेळ खेळत आहेत. कर्नाटक, झारखंडमध्ये जिंकले. त्यावेळी ईव्हीएमवर संशय नव्हता आणि लोकसभेच्या निवडणुका या ईव्हीएमवरच झाल्या, तेव्हाही संशय नव्हता, आता मात्र संशय घेत आहेत. लोकशाहीमध्ये जय-पराजय होत असतो, मतदारांनी दिलेल्या कौलाचा नेत्यांनी सन्मान ठेवला पाहिजे,असेही ते म्हणाले, तर मुख्यमंत्री कोण याबाबत पत्रकारांनी प्रश्न केला असता याबाबत वरिष्ठ योग्य तो निर्णय घेतील, असे ते म्हणाले. महाविकास आघाडी ईव्हीएम संशय घेत आता रडीचा डाव खेळताना दिसत आहे. संशय घेणाऱ्या निवडून आलेल्या आमदारांनी राजीनामा द्यावा, मग त्यांची भूमिका मांडावी असा टोलाही त्यांनीह विरोधकांना लगावला. मविआचे जे आमदार निवडून आले तिथे बॅलेट पेपर होते का ? असा प्रश्नही विरोधकांना केला. आता विरोधकांनी मोठ्या मनाने पराभव स्विकारावा असा सल्लाही दिला. तर या यशामध्ये विचार परिवाराचे महत्त्वाचे योगदान आहे. संघाचे मार्गदर्शन, मतदान वाढवण्यासाठीची मोहीम या सगळ्याचा उपयोग मतदान वाढण्यात झाला, हे सत्य असल्याचे सांगितले.



तर ठाकरे यांनी संपविण्याच्या गोष्टी केल्या परंतु, कोणी कोणाला संपवत नसतो, जो तो आपल्या कर्माने, कृतीने संपतो. पक्षाला थोडसे अपयश आले म्हणजे संपले असे नसते, पुन्हा मेहनत घ्यावी पक्ष उभा करावा, आमच्या पक्षाने लोकसभेला अपयश बघितले आहे. नंतर आम्ही खचून न जाता काम केले आणि जनतेचा विश्र्वास संपादन केला. फक्त फेसबुक लाईव्ह केले की जनता स्वीकारत नाही हे लक्षात घ्यावे, असा टोलाही विरोधकांना यावेळी विधान परिषदेचे गटनेते आमदार प्रविण दरेकर यांना लगावला.

CMYK

## काँग्रेसच्या हिंदुद्वेषाने भगवी लाट...

पूर्वी तलवारीने लढली जायची. धर्मासाठी रांगणामध्ये रक्तांचे पाट वाहायचे. त्यानंतर काळ बदलला अन् लोकशाहीमध्ये मताच्या रूपाने हे युद्ध लढले जाऊ लागले. भारताच्या इतिहासामध्ये महाराष्ट्रात प्रथमच २० नोव्हेंबरचा लोकशाहीचा उत्सव धर्मयुद्धासारखा लढला गेला. यावेळी प्रथमच संपूर्ण महाराष्ट्राने भगवी लाट अनुभवली. विरोधकांच्या अपेक्षेबाहेर भाजपाला यश मिळाले. काँग्रेसच्या विखारी प्रचाराला मतदारांनी सडेतोड उत्तर देऊन त्यांनी काँग्रेसता त्याची जागा दाखवून दिली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गलिच्छ राजकारण करून काँग्रेसने समाजामध्ये जातीयतेचे विष पेरले खोट्या धर्मनिरपेक्षतेची दवंडी देऊन काँग्रेसने घराणेशाहीला सर्वाधिक महत्त्व देत राष्ट्राला दुय्यम स्थान दिले. वाट्टेल त्या घराता जाऊन महाविकास आघाडीला राज्याची सत्ता हवी होती. काँग्रेसच्या भूलथापांना बळी न पडता व्होट जिहादला मतदारांनी धर्मयुद्धाने चोख प्रत्युत्तर दिले. वाढलेली मतदानाची टक्केवारी हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. नेहमीप्रमाणे समाजामध्ये विष पेरून हिंदूंच्या मतविभाजनाचा आटोकाट प्रयत्न यावेळीही काँग्रेसने करून बघितला, परंतु तो त्यांच्याच अंगलट आला. महाविकास आघाडीला फक्त ४६ जागांवर मतदारांनी नेऊन ठेवले. अखेर त्यांना आपल्या कर्माची फळे मिळाली. राहुल गांधींना देशाची संस्कृती, परंपरा आणि उज्वल भविष्याशी काहीएक देणेघेणे नाही. मातृभूमी या संकल्पनेला त्यांचा विरोध, प्रभू श्रीरामाच्या अस्तित्वालाही त्यांचा विरोध आहे. त्यामुळे ठासून खोटे बोलले की, लोकांना ते खरे वाटायला लागते. राहुल गांधीची ही चात नेमकी यावेळी लोकांनी ओळखली. भारतामध्ये आरक्षणाचे तारणहार म्हणून मिरवायचे अन् परदेशामध्ये जाऊन आरक्षण संपविण्याच्या गोष्टी करायच्या हा दुटप्पीपणाही लोकांनी हेस्ता जवळपास ६० वर्ष खोट्या धर्मनिरपेक्षतेचा येथील हिंदूंनी सतत मार खाल्ला. दुसऱ्या पक्षाला जातीयवादी म्हणणारी काँग्रेस किती जातीयवादी आहे, हे ओळखण्यास लोकांना जवळपास ६० वर्षे लागली. ६० वर्षे काँग्रेस हिंदूंच्या अस्मितेशी खेळली. संस्कृती आणि परंपरा पायी तुडविल्या गुलामीच्या मानसिकतेमधून काँग्रेसने लोकांना बाहेर येऊच दिले नाही. जगामध्ये सर्वाधिक सहिष्णु कोन असेल तर तो हिंदू होय. जगा आणि जगू द्या, हा एकच हिंदूंचा मंत्र आहे. नेमका पाच बाबीचा फायदा घेत काँग्रेसने येथील हिंदूंना कायम दुय्यम नागरिकाचे स्थान दिले. अशी ही हिंदुद्रोही काँग्रेस भारतामध्ये कशी फोफावती हेही एक आश्र्चर्यच म्हणावे लागेल. मतांच्या राजकारणासाठी पावेळी काँग्रेसने नैतिकतेचे सर्वच मार्ग सोडून दिले होते. त्यामुळे 'बटेंगे तो कटेंगे' हा योगी आदित्यनाथ यांचा नारा व 'एक है तो सेफ हैं' हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नारा पा निवडणुकीमध्ये काँग्रेसवर भारी पडला. सत्तेच्या मोहापापी उद्धव ठाकरेही भरकटत गेले. त्यांनी हिंदुत्व सोडले त्यामुळे मतदारांनीही त्यांना सोडले अन् शरद पवारांचा छुपा हेतू साध्य झाला. हिंदू या राष्ट्राचा कणा आहे. हे उद्धव ठाकरेही साफ विसरले. संस्कृती आणि परंपरा या देशाचा आत्मा आहे. हे पण उद्धव ठाकरे विसरते. त्यामुळे जे व्हायचे होते ते होऊन गेले. निव्वळ सत्तेसाठी केलेले राजकारण अधिक काळ टिकू शकत नाही, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांना अजूनही कळते नाही. देशाला खिळखिळे करणाऱ्या विघातक शक्ती अजूनही देशाबाहेर कार्यरत आहेत. काँग्रेसही सतत त्यांच्या पाठीशी उभी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे काँग्रेसने येथील हिंदूंना सतत दाबण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सनातन वैदिक परंपरेच्या भक्कम पायावर उभा असलेला हा देश कधीच वाकला नाही आणि कधीच वाकणारही नाही, हे त्रिकालबाधित सत्य आहे. आपल्याच काळ्या कृत्याने काँग्रेस आतून पूर्णपणे खिळखिळी झाली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या पायाखालची वाळू सरकली आहे. काँग्रेसचा पूर्वीपासून सुरू असलेला हा दुटप्पीपणा लोकांनी यावेळी ओळखला. तो कायम स्मरणात ठेवला तरच या देशाचे भविष्य उज्वल राहू शकते, एवढे मात्र नक्की.

# जेवणाच्या ताटात चपाती वाढताना करू नका 'या' चुका, नाहीतर भोगावे लागतील परिणाम

आपल्याकडे प्रत्येक गोष्ट कशी असावी? याबाबत शास्त्रीय आधार असतो. तसेच आपल्या पूर्वजांनी ही काही गोष्टी सविस्तर सांगितलेल्या आहेत. पण धावपळीच्या जीवनशैलीत प्रत्येक गोष्ट आपल्याकडून होतेचं असं नाही. यामध्ये महत्त्वाचे म्हणजे जेवण करताना ते कसं वाढावं याबद्दल काही नियम सांगण्यात आले आहेत. जेवणाच्या ताटात भाजी, चपाती, आमटी कुठल्या दिशेला, पापड, लिंबू कोणत्या दिशेला पाहिजे? या सर्व गोष्टी वास्तुशास्त्रात सांगण्यात आले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेवणाच्या ताटात चपाती वाढताना वास्तुशास्त्रानुसार विचार केला तर काही चूका आहेत त्या टाळणे महत्त्वाचे आहेत. असे नाही झाले तर घरात क्लेश सुरू होण्यासोबतच घरातील धन-दौलत सुद्धा निघून जाऊ शकते. अशा कोणत्या चुका आहेत त्या केल्या नाही पाहिजे त्याबद्दल जाणून घ्या...

चुकूनही हातात चपाती देऊ नका

जेवणाच्या ताटात चपाती वाढताना हातात चुकूनही चपाती देऊ नका. वास्तुशास्त्रानुसार हातात चपाती देल्याने गरिबी वाढू शकते. तसे आपण केले पुण्य देखील कमी होऊ शकते. म्हणूनच अशा चुका करू नका. चपाती नेहमी ताटात किंवा भांड्यात ठेवावी.



एकत्र ३ चपाती वाढू नका

अनेक वेळा नकळत अशा चुका हातातून घडतात ज्यामुळे आयुष्यात मोठे वादळे येतात. त्यातलाच एक म्हणजे चपात्या वाढवणे... जेवणाच्या ताटात एकदम तीन चपात्या वाढल्याम ुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. तसेच संपूर्ण कुटुंबाला समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. सनातन धर्मानुसार भोजन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला केव्हाही ३ चपात्या एकत्र वाढू नका...

पाहूण्यांना शिळ्या चपात्या वाढू नका

अनेकदा शिळ्या चपात्या दुसऱ्या दिवशी खाल्या जातात. जर तुम्ही याच शिळ्या चपात्या चुकून घरी आलेल्या पाहूण्यांना वाढल्या तर तुमचे नुकसान होऊ शकते. असे केल्याने देव आपल्यावर नाराज होऊ शकतात. त्यामुळे अशा चुक कधीही करु नका...

पुष्कळदा प्युपे उरले तर ते ताशच ठेवून खाल्ले जातात. जर तुम्ही त्या दगडाच्या चकत्या खाल्ल्या तरच तुमच्याकडे एखादा साधू किंवा पाहुणा आला आणि तुम्ही त्यांना दगड खाऊ देऊ नका तर बरे. असे केल्याने देव अयावर संतप्त होतो. म्हणूनच कधीही चूक करू नका.

गरजेपेक्षा ४ चपात्या जास्त बनवा

ज्योतिषाचार्यांच्या मते, घरातील कुटुंबांसाठी जेवढ्या चपातीची गरज आहे, त्यापेक्षा जास्त ४ चपात्या बनवा. कारण यामधली पहिली चपाती गाईसाठी बनवली जाते. तर शेवटची चपाती ही नेहमी श्वान (कुत्र्यासाठी) बनवली जाते. तर उरलेल्या दोन चपात्या या पाहुण्यांसाठी ठेवल्या पाहिजे.. असे केल्याने घर कधी रिकामी राहत नाही आणि घरात सुख-शांती टिकून राहते.

## गरोदरपणात काळी का पडते त्वचा, जर काळजी नाही घेतली, तर होते हे नुकसान

गरोदरपणात केवळ शरीरातच नाही, तर त्वचेतही अनेक बदल दिसून येतात. गर्भवती महिलांना केवळ मूड स्विंगमुळेच त्रास होत नाही, तर त्वचेवर खाज सुटणे किंवा लालसरपणा यासारख्या त्वचेच्या समस्यांमुळे देखील त्रास होतो. या नुकसानांमध्ये त्वचा काळे होणे देखील समाविष्ट आहे. हे गरोदरपणात सामान्य आहे, परंतु जर त्यावर उपचार केले गेले नाहीत, तर ही एक गंभीर समस्या देखील बनू शकते. या लेखात आम्ही तुम्हाला गरोदरपणात त्वचा काळी का पडते आणि त्यामुळे होणारे नुकसान कसे दूर करता येईल, हे सांगणार आहोत.

गरोदरपणात त्वचा काळी पडणे याला मेलास्मा म्हणतात. यामध्ये शरीरात अधिक मेलेनिन तयार होऊ लागते. मेलेनिन हे एक रंगद्रव्य आहे आणि गर्भधारणेदरम्यान हार्मोनल बदलांमुळे त्वचेवर परिणाम होतो. या दरम्यान, त्वचेवर काळे डाग दिसतात, जे ओठांच्या वर, नाकाच्या आसपास, म्हणजे गालावर दिसतात. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की हे नैसर्गिक आहे, परंतु काळजी न घेतल्यास त्याचे रूपांतर रंगद्रव्यात होऊ शकते. विशेषत: घसा आणि चेहऱ्याचा रंग गडद होऊ लागतो.

जाणून घ्या ते टाळण्याचे उपाय

गरोदरपणात त्वचा काळी पडणे सामान्य गोष्ट आहे, परंतु महिलांनी त्यासंबंधी अनेक उपाय अवलंबावेत. तसे, दररोज कोरफडीचा वापर केल्याने त्वचेला काळी पडण्यापासून वाचवता येते.

नैसर्गिक उपायांमध्ये तुम्ही लिंबाच्या रसाची मदत घेऊ शकता. यामध्ये व्हिटॅमिन सी असते ज्यामुळे त्वचा सुधारते. लिंबाचा रस प्रभावित त्वचेवर लावा आणि नंतर सामान्य पाण्याने धुवा.

तसे, टॅनिंग किंवा पिगमेंटेशन कमी करण्यासाठी हळद देखील प्रभावी मानली जाते. यात कर्क्यूमिन असते, जे रंगद्रव्य असलेल्या भागांना हलके करण्याचे काम करते. हळदीचा मास्क बनवण्यासाठी त्यात गुलाब पाणी, नारळाचे दूध आणि लिंबाचा रस मिसळा आणि त्वचेवर लावा.

तसे, बटाटा आणि कांद्याच्या रसाने देखील टॅनिंग किंवा पिगमेंटेशन कमी केले जाऊ शकते. जर गर्भधारणेदरम्यान आणि नंतर त्वचेची काळजी घेतली नाही, तर ही समस्या कायम राहू शकते.

## लघवीतून येत आहे दुर्गंधी, मग तुम्हाला झाले आहे हे इन्फेक्शन, अशा प्रकारे करा बचाव

तुमच्या लघवीला दुर्गंधी येऊ लागली आहे का? त्यामुळे आता तुम्हाला डॉक्टरांकडे जाण्याची गरज आहे. कारण लघवीच्या वासाचा अर्थ असा होतो की तुम्हाला यूटीआय संसर्ग झाला आहे. यावर योग्य उपचार न केल्यास किडनी निकामी होऊ शकते. बहुतेक प्रकरणांमध्ये, मूत्रपिंड निकामी होणे देखील या संसर्गामुळे होते. हा आजार महिलांमध्ये जास्त दिसून येतो. ही समस्या तुम्हाला कोणत्याही वयात उद्भवू शकते.

डॉक्टरांच्या मते, जेव्हा धोकादायक जीवाणू मूत्रमार्गात प्रवेश करतात, तेव्हा ते यूटीआय संसर्गास कारणीभूत ठरते. वैयक्तिक स्वच्छतेची काळजी न घेतल्याने आणि सार्वजनिक शौचालयाचा वापर न केल्यामुळे असे घडते. ळऊघ ही एक सामान्य समस्या असली तरी त्याचा परिणाम लघवीमार्गे मूत्रपिंडात जातो. सहसा, हा संसर्ग काही दिवसात स्वत:च बरा होतो, परंतु लघवीच्या वासाची लक्षणे आठवडाभर राहिल्यास डॉक्टरकडे जावे.

या संसर्गाबाबत निष्काळजी राहू नका. यूटीआय संसर्गावर वेळेवर उपचार न केल्यास ही मोठी समस्या बनू शकते. मधुमेह आणि हृदयरोग्यांनी याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. या रुग्णांमध्ये युरिन इन्फेक्शन घातक ठरू शकते.

संजय गांधी हॉस्पिटलचे ज्येष्ठ चिकित्सक डॉ. अजय विकास सांगतात की, जर आपण पाणी कमी प्यायले, तर लघवीही कमी येते. त्यामुळे शरीरातून घातक पदार्थ बाहेर पडत नाहीत. त्यामुळे शरीरात बॅक्टेरियाही वाढू लागतात. त्यामुळे ळऊघ संसर्ग होतो आणि लघवीला वास येतो. कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांम ध्ये ळऊघ संसर्गाचा धोका असतो. ज्यांना स्टोनची समस्या आहे, त्यांनाही हे होऊ शकते. लोकांनी प्रायव्हेट पार्टच्या आजूबाजूला स्वच्छता ठेवली नाही, तर फंगल इन्फेक्शनचा धोका असतो. उरपवळवर आणि यीस्ट संसर्ग याचे कारण असू शकते. या संसर्गाम ुळे लघवीलाही वास येऊ लागतो. यासोबतच प्रायव्हेट पार्टच्या आजूबाजूला खाज आणि सूज येण्याची समस्या देखील होऊ शकते. अशा स्थितीत प्रायव्हेट पार्ट स्वच्छ करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे घ्या काळजी

दिवसातून सात ते आठ ग्लास पाणी प्या

खाजगी भाग स्वच्छ ठेवा

दारू पिणे टाळा

खूप घट्ट अंडरवियर घालू नका

## स्मार्टफोनमध्ये किती वापरली जाते चांदी? का आहे त्याची गरज, जाणून घ्या येथे

जेव्हापासून एप्पल ने भारतात आपले अस्तित्व वाढवले ??आहे, तेव्हापासून स्मार्टफोन उत्पादनात भारताची चांदी होत आहे. येत्या काही वर्षांत या क्षेत्रात भारताची चांदीच चांदी होणार आहे. याचे कारण म्हणजे ॲपलचे २५ टक्के फोन संपूर्ण जगात भारतातून निर्यात होतील. पण आज प्रश्न जरा वेगळा आहे, तुमच्या फोनमध्ये किती चांदी आहे? होय, काळजी करू नका. स्मार्टफोन निर्मितीमध्ये चांदीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. हा वापर औद्योगिक वापराच्या कक्षेत ठेवला जातो. आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की तुमच्या फोनमध्ये चांदी किती प्रमाणात आणि का वापरली जाते?

जर सिम कार्ड सोडले, तर मोबाईल फोनच्या आत काय असते हे क्वचितच कोणाला माहीत असेल? या छोट्या उपकरणात अनेक महागड्या धातू आणि साहित्य आहेत. कोणत्याही स्मार्टफोनमध्ये सोने, चांदी, पॅलेडियम आणि प्लॅटिनमसह २० हून अधिक साहित्य वापरले जातात. तसे, अनेक प्रकारच्या सामग्रीचे प्रमाण खूप कमी आहे. जर आपण सामान्य आयफोनबद्दल बोललो तर त्यात ०.३४ ग्रॅम चांदी असते. अँड्रॉइड मोबाईलमध्ये त्याचे प्रमाण वाढते. जे मॉडेलनुसार ०.५० ते ०.९० ग्रॅम पर्यंत पोहोचते. सध्या जगभरात ७०० कोटींहून अधिक मोबाईल फोन कार्यरत आहेत. यावरून तुम्ही अंदाज लावू शकता की तुमच्या मोबाईलच्या निर्मितीमध्ये किती चांदी वापरली जात असेल. विशेष म्हणजे मोबाईल फोन रिसायकल करून ती चांदी पुन्हा वापरता येते.

आता प्रश्न असा आहे की मोबाईल फोनमध्ये चांदी का वापरली जाते किंवा स्मार्टफोन म्हणायचे? खरे तर मोबाईल फोनमध्ये एक सर्किट बोर्ड वापरला जातो, जो वीज जोडणीसाठी वापरला जातो. हा बोर्ड चांदीपासून तयार केला जातो. चांदी हा विजेचा चांगला वाहक मानला जातो, परंतु मोबाईल फोनसह लहान विद्युत वस्तूंमध्ये त्याचा वापर केला जातो. याशिवाय, इतर धातू आणि सामग्रीच्या तुलनेत ते खूप महाग आहे. त्यामुळे स्मार्टफोन आणि इतर इलेक्ट्रिक वस्तूंमध्ये याचा वापर केला जातो. ज्याचा टॉर्च, ओव्हन, मायक्रोवेव्ह, टेलिव्हिजन इत्यादींमध्ये वापर केला जातो.

दुसरीकडे, भारतात स्मार्टफोन उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे. ॲपलच्या आगमनानंतर, मोबाईल निर्मितीमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात भारताने निर्यात केलेल्या मोबाईलमध्ये ॲपलचा वाटा ५० टक्क्यांहून अधिक होता. येत्या तीन वर्षात ॲपल जागतिक वापराच्या २५ टक्के भारतातून निर्यात करेल. त्याचबरोबर सॅमसंग आणि इतर कंपन्यांकडूनही उत्पादन सुरू आहे. अशा परिस्थितीत भारतात चांदीचा वापर आणखी वाढेल. गेल्या आर्थिक वर्षात भारतात ३०० दशलक्षाहून अधिक स्मार्टफोन्सची निर्मिती झाली. ज्यात आणखी वाढ होण्याची अपेक्षा आहे.

## आता तुमचे आवडीचे पदार्थ खाऊनही होऊ शकतं तुमचं वजन कमी; डाएटचा 'हा' नियम पाळा

आजकाल आपल्यापैकी अनेकजण वजन कमी करण्यावर भर देतात. वजन कमी करण्यासाठी आपण ना-ना पद्धतीचा अवलंब करतो, मात्र तरीही अनेकदा वजनात घट होताना दिसत नाही. आपल्या मनात गंमतीने असा विचारही येतो की, आपल्या आवडीचे कितीही पदार्थ खाल्ले आणि तरीही आपलं वजन वाढलंच नाही, तर किती बरं होईल. मात्र तुम्हाला जसं वाटतंय, तसं खरंच घडणार असेल तर.

आज आम्ही तुम्हाला अशा एक डाएटची माहिती देणार आहोत, ज्यामध्ये तुम्ही तुमच्या आवडीचे पदार्थही खाऊ शकता आणि तुमचं वजनंही कमी होईल. तुम्हाला ही गोष्ट खोटी वाटेल, मात्र खरंच असं डाएट आहे. ८०२० असा या डाएटचा रूल आहे.

डाएटचा ८०२० नियम काय सांगतो?

वजन कमी करण्यासाठी आपण सगळे डाएट तर करतो. मात्र ८०२० हा नियम काय आहे, हे फार कमी लोकांना माहिती असेल. डाएटच्या या नियमानुसार, याअंतर्गत तुम्हाला ८० टक्के पौष्टिक आहार आणि २० टक्के तुम्ही तुमच्या आवडीचे पदार्थ खाऊ शकता.

तज्ज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे, या डाएटचा नियम तुम्हाला फॉलो करताना कॅलरीज तसंच कार्ब्स काऊंट करण्याची देखील गरज नाहीये. त्यामुळे या नियमानुसार, तुम्ही केवळ डाएट फूड न खाता तुमच्या आवडीचे पदार्थही खाऊ शकता.

कसा फॉलो कराल ८०२० डाएटचा नियम?

हे डाएट करताना तुम्ही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, तुम्ही तुमच्या आहारामध्ये विविध रंगाच्या भाज्यांचा अधिक समावेश केला पाहिजे. तसंच ज्या भाज्यांमुळे पचनक्रिया सुधारेल अशा भाज्यांचा आणि फळांचा तुमच्या आहारात समावेश करावा. यामध्ये सिझनल भाज्या आणि फळांचा सामवेश व्हायला हवा.

८० टक्के डाएटमध्ये काय समाविष्ट कराल?

पौष्टिक आहारामध्ये तुम्ही भाज्या, फळं, मासे आणि चिकन यांचा समावेश करू शकता. त्याचप्रमाणे, डेअरी प्रोडक्टसचाही तुम्ही समावेश यामध्ये करू शकता. वजन कमी करण्यासाठी तुम्ही फॅट फ्री दुधाचा वापर करू शकता.


आवडीच्या गोष्टींमध्ये कशाचा समावेश कराल?

यामध्ये तुम्ही त्या खाद्यपदार्थांचा समावेश करावा, जे तुम्हाला भरपूर आवडतात. यामध्ये सॅच्युरेटेड फॅट, रेड मीट, अल्कोहोल, रिफाईंड कार्ब्स तसंच साखरयुक्त पदार्थांचा समावेश करू शकता. यामध्ये तुम्हाला अचानक रात्रीच्या वेळेस तुम्हाला गोड काही खावंसं वाटू शकतं. मात्र हे खाताना त्याच्या प्रमाणात कधीही वाढ होणार नाही, याची काळजी घ्या.

## सौंदर्य वाढवण्यासोबतच दागिने घालण्यामागे आहेत धार्मिक आणि वैज्ञानिक फायदे

शतकानुशतके स्त्रिया त्यांचे सौंदर्य वाढवण्यासाठी विविध प्रकारचे दागिने घालत आहेत. महिलांना या दागिन्यांचे नेहमीच आकर्षण होते, जे आजही कायम आहे. स्त्रिया आपले सौंदर्य वाढवण्यासाठी जे दागिने घालतात ते धार्मिक आणि शास्त्रोक्त दृष्टीने खूप महत्त्वाचे मानले जाते. महिलांनी परिधान केलेल्या दागिन्यांचे धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व जाणून घेऊया.

बांगड्या - १६ बांगड्या शोभेच्या बाबतीत खूप खास आहेत. बांगड्यांशिवाय वधूचा मेकअप अपूर्ण मानला जातो. मान्यतेनुसार बांगड्या हे सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. बांगड्या चंद्राशी संबंधित मानल्या जातात. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, सोन्याच्या बांगड्या शरीरातील रक्त परिसंचरण नियंत्रित करतात आणि रक्तदाब राखण्यासाठी देखील उपयुक्त आहेत.







झुमके

सर्व मुली आणि स्त्रिया त्यांच्या कानात सुंदर झुमके किंवा इअररिंग घालतात, जे त्यांच्या सौंदर्यात भर घालतात. लग्नानंतर स्त्रियांनी कोणाचेही वाईट बोलणे किंवा ऐकणे यापासून दूर राहावे या धड्याचे प्रतीक कर्णफ ूल मानले जाते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून असे म्हटले जाते की कानाच्या बाहेरील भागात अनेक एक्यूप्रेशर पॉइंट असतात. या ?क्युप्रेशर पॉईंट्सवर कानातल्यांचा दाब पडल्याने किडनी आणि मूत्राशय निरोगी राहतात आणि स्त्रियांचे प्रजनन चक्र सुधारण्यास मदत होते. सोन्याचे झुमके परिधान केल्याने अतिक्रियाशीलता आणि उत्तेजनाबाबत सतर्कता देखील सुधारते.

नाकाची फुली किंवा नथ

स्त्रिया लग्न आणि इतर सण इत्यादी प्रसंगी नाकात नथ घालतात. असे म ानले जाते की विवाहित महिलेने नाकात नथ घातल्यास पतीचे आरोग्य चांगले राहते आणि घरामध्ये समृद्धी येते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, नाकाची नथ घालणे थेट स्त्रीच्या गर्भाशयाशी संबंधित आहे. सोन्याचे झुमके किंवा लवंग घातल्याने गर्भधारणेदरम्यान आणि प्रसूतीदरम्यान होणारा त्रास कमी होतो.

मंगळसूत्र किंवा हार

मंगळसूत्र हे पती-पत्नीमधील प्रेमाचे आणि स्त्रीच्या सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. असे मानले जाते की मंगळसूत्र किंवा हार सकारात्मक ऊर्जा स्वत:कडे आकर्षित करते आणि मन आणि हृदय शांत ठेवते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून असे मानले जाते की गळ्यात अनेक तंत्रिका वाहिन्या असतात, ज्या सोन्याच्या हाराच्या घर्षणामुळे शरीरातील रक्त परिसंचरण नियंत्रित करण्यास मदत करतात.

जोडवी

बहुतेक विवाहित स्त्रिया पायाच्या बोटात जोडवी घालतात. असे मानले जाते की पायाच्या अंगठ्यात जोडवी घातल्याने महिलांचे आरोग्य चांगले राहते आणि घरात समृद्धी राहते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, दुसऱ्या पायाच्या अंगठ्याम ध्ये असलेल्या शिरा गर्भाशयातून हृदयाकडे जातात. जोडवी धारण केल्याने प्रजनन चक्र सुधारते आणि स्त्रियांचा रक्तदाबही नियंत्रणात राहतो.

डोक्याची बिंदी

असे मानले जाते की बिंदी वधूने तिच्या डोक्याच्या अगदी मध्यभागी परिधान केली आहे जेणेकरून लग्नानंतर, ती नेहमीच तिच्या आयुष्यात योग्य आणि सरळ मार्गाचा अवलंब करते आणि कोणताही पक्षपात न करता योग्य निर्णय घेऊ शकते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, मांग टिक्का कपाळावर धारण केल्याने मन शांत आणि एकाग्र होण्यास मदत होते आणि शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास देखील मदत होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### देवेंद्र फडणवीसांना मुख्यमंत्री करावे यासाठी भाजप महिला आघाडीने पंतप्रधान नरेंद्र मोदींना लिहिले रक्ताने पत्र




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** :सध्या राज्यात मुख्यमंत्री कोण याची जोरदार चर्चा सुरु आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री व्हावे अशी मागणी राज्यभरातून भाजप कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. छ.संभाजीनगरमध्ये देखील देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत यासाठी महिला आघाडीच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रक्ताने पत्र लिहिण्यात आले. गेली पाच वर्ष देवेंद्र फडणवीस यांनी पक्षासाठी अहोरात्र काम केलं आहे. त्यांच्यावर प्रचंड टीका झाली मात्र त्यांनी कामामध्ये कुठलीच कसर सोडली नाही. यामुळे देवेंद्र फडणवीस यांना राज्याचे मुख्यमंत्री करावं अशी मागणी छत्रपती संभाजीनगरच्या भाजप महिला पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

### आधारवाडीतील इमारतीच्या पंधराव्या मजल्यावर भीषण आग; इमारतीत अडकलेल्यांना बाहेर काढण्याचे काम सुरु



**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याणच्या आधारवाडी परिसरातील एका हौसिंग सोसायटीमधील पंधराव्या मजल्यावर आज संध्याकाळी अचानक भीषण आग लागली. आगीमुळे इमारतीतून मोठा धुराचा लोट निघाल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या आठ ते नऊ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाचे जवान युद्धपातळीवर आग विझवण्याचे आणि इमारतीत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे काम करत आहेत. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र अनेक रहिवासी इमारतीत अडकून पडल्याने बचावकार्य सुरू आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहे.

### गेल्या १० वर्षात कधी ३५० तर कधी २५० कोटी छापले, या ५ चित्रपटांनी अल्लू अर्जुनला बनवले सुपरस्टार

**मुंबई/प्रतिनिधी** : सुपरस्टार अल्लू अर्जुन हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठा स्टार आहे. अल्लू अर्जुनचे चाहते जगभरात, विशेषतः दक्षिणेत आहेत. २०२१ मध्ये रिलीज झालेला अल्लू अर्जुनचा 'पुष्पा: द राइज' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त हिट ठरला होता. आता या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाकडे लोकांचे लक्ष लागले आहे. 'पुष्पा २: द रुल' रिलीज होण्यास फार दिवस उरलेले नाहीत. या चित्रपटाची चाहत्यांनी प्रतीक्षा केली आहे. 'पुष्पा २' रिलीज होण्यापूर्वी आम्ही तुमच्यासाठी अल्लू अर्जुनच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या ५ चित्रपटांची माहिती घेऊन आलो आहोत.

अल्लू अर्जुनचे सर्वाधिक कमाई करणारे ५ चित्रपट

'पुष्पा: द राइज' – अल्लू अर्जुनचा डिसेंबर २०२१ मध्ये रिलीज झालेला 'पुष्पा: द राइज' कोण विसरू शकेल. या चित्रपटाने प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर पकड ठेवली होती. या चित्रपटाने भारतीय चित्रपटसृष्टीतील पॅन इंडिया सुपरस्टार्सच्या यादीत अल्लू अर्जुनचा समावेश केला आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ३९५ कोटींची कमाई केली होती. हा चित्रपट अल्लू अर्जुनचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला. हिंदी चित्रपटसृष्टीतही 'पुष्पा : द राइज'ला अप्रतिम प्रतिसाद मिळाला.

अला वैकुंठपुरमुलू – अल्लू अर्जुनचा चित्रपट 'अला वैकुंठापूरमुलू'ला बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद मिळाला. या चित्रपटाचे दिग्दर्शन त्रिविक्रम यांनी केले होते. 'अला वैकुंठपुरमुलू'ने जगभरातील बॉक्स ऑफिसवर २६४ कोटी रुपयांहून अधिक कमाई केली होती. यासह अल्लू अर्जुनचा हा दुसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला.

सरायनोडू – अल्लू अर्जुनचा 'सरायनोडू' हा चित्रपट २०१६ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन बोयापती श्रीनू यांनी केले होते. हा एक मास-क्शन ड्रामा चित्रपट होता. अल्लू अर्जुनच्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. रकुल प्रीत सिंह 'सरायनोडू'मध्ये मुख्य भूमिकेत दिसली होती. या चित्रपटाने जागतिक बॉक्स ऑफिसवर एकूण १२८ कोटींची कमाई केली होती.

दुव्वाद जगन्धाम – अल्लू अर्जुन २०१७ च्या 'डीजे: दुव्वाद जगन्धाम' मध्ये दोन आवृत्ती खेळताना दिसला होता. हा मास-क्शनर बॉक्स ऑफिसवर यशस्वी उपक्रम ठरला. कारण याने ११५ कोटींचा चांगला व्यवसाय केला.

रेस गुर्रम – २०१४ मध्ये आलेला क्शन-कॉमेडी ड्रामा 'रेस गुर्रम' बॉक्स ऑफिसवर खूप गाजला होता. अल्लू अर्जुन, श्रुती हासन आणि रवी किशन हे या चित्रपटाचे मुख्य कलाकार होते. हा चित्रपट 'लकी: द रेसर' म्हणून हिंदीत डब करण्यात आला होता. हिंदी-डब केलेल्या आवृत्तीने त्याच्या सॅटेलाइट प्रकाशनाच्या वेळी चांगली कामगिरी केली. 'रेस गुरम'ने जगभरात बॉक्स ऑफिसवर १०१ कोटींची कमाई केली होती.

# महायुतीच्या विजयाच्या धसक्याने मौलाना नोमानींनी मागितली जाहीर माफी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. या घवघवीत यशानंतर दरदरुन घाम फुटलेल्या मौलाना सज्जाद नोमानी यांनी 'व्होट जिहाद'बाबत केलेल्या वक्तव्याबद्दल बिनशर्त माफी मागितली आहे. कोणत्याही समाजाला दुखावण्याचा आपला हेतू नव्हता, असे त्यांनी आता स्पष्ट केले आहे.

राज्याच्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने २३५ जागा मिळवल्याने आता सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. एकट्या भाजपाने एकूण १३२ जागा जिंकल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीमध्ये लाडकी बहिण योजना, व्होट जिहाद आणि मराठा आरक्षण असे अनेक मुद्दे गाजले. त्यातील एक



व्होट जिहादचा मुद्दा चांगलाच चर्चेत आला होता. मौलाना सज्जाद नोमानी यांनी भाजपाला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिमांची खिल्ली उडवली आणि स्वत:चे नाव धनश्याम ठेवण्याचा सल्ला दिला होता. मात्र आता विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर नोमानी यांनी बिनशर्त जाहीर माफी मागितली आहे. त्यांचा हेतू कोणत्याही विशिष्ट समुदायाला लक्ष्य करण्याचा किंवा फतवा काढण्याचा नव्हता, असे त्यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या पत्रात नमूद केले आहे.

मौलाना सज्जाद नोमानी यांनी निवडणुकीदरम्यान वादग्रस्त फतवा काढला होता. राज्यातील भाजपाला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिमांना इस्लामच्या कक्षेबाहेर फेकून दिले पाहिजे. तसेच त्यादरम्यान त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामध्ये त्यांनी भाजपाला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिमांची खिल्ली उडवली. तसेच ज्या मुसलमानांनी भाजपाला पाठिंबा दिला त्यांनी आपले नाव बदलून धनश्याम करा, असा टोला लगावला होता.

मात्र निवडणुकीच्या निकालानंतर नोमानी यांचे एक पत्र समोर आले आहे. ज्यामध्ये त्यांनी त्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागितली आहे. तसेच लोकसभा निवडणुकीत लोकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवलेल्या लोकांसाठी ते वक्तव्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच आपले शब्द त्या व्यक्तींसाठी आहेत, व्यापक मुस्लिम समाजासाठी नाहीत, असेही ते म्हणाले आहेत. तसेच माझे हे विधान महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या आधीचे आहे. माझा कोणत्याही समाजावर टिप्पणी करण्याचा हेतू नव्हता, तसेच आम्ही फतवाही काढला नव्हता, असे म्हणत नोमानी यांनी आपल्या पत्रात बिनशर्त माफी मागितली आहे.

## एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्रिपद सोडलं; राज्यपालांकडे राजीनामा सुपूर्द; पुढला सीएम कोण?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. एकनाथ शिंदेंनी राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीमध्ये शिंदेंनी राजीनामा सुपूर्द केला आहे. राज्य सरकारचा कार्यकाळ आज संपणार आहे. २६ नोव्हेंबर ही विद्यमान विधानसभेच्या कार्यकाळाची शेवटची तारीख असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मात्र नवे मुख्यमंत्र्यांची निवड होईपर्यंत राज्याचा कारभार शिंदेच पाहणार आहेत. काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून ते नवं सरकार स्थापन होईपर्यंत कारभार संभाळणार



आहेत.

मुख्यमंत्री कोण याकडे सर्वाचं लक्ष लागलेलं असताना विधानसभेचा पंच वार्षिक कार्यकाळ संपलेला आहे. विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने तांत्रिक बाब म्हणून यासाठी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागतो. मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतरच विधानसभा बरखास्त होते. मुख्यमंत्री सकाळी ११ वाजता राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द करतील अशी माहिती समोर येत होती. त्याप्रमाणे सकाळी साडे दहापासूनच घडामोडींना सुरुवात झाली. सर्वात आधी 'देवगिरी' बंगल्यावरुन अजित पवार निघाले आणि राजभवनामध्ये दाखल झाले. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या 'सागर' बंगल्यावरुन राजभवनावर दाखल झाले. सर्वात शेवटी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राजभवानात दाखल झाले. तिन्ही नेत्यांनी राज्यपालांची भेट घेतली. त्यानंतर शिंदेंनी राजीनामा दिला. शिंदेंनी राजीनामा दिल्याने आता पुढील सरकारच्या स्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून ही तांत्रिक बाब असली तर सत्ता स्थापनेसाठी फार महत्त्वाची घडामोड आहे. भारतीय जनता पार्टीने विधानसभा निवडणुकीमध्ये १३२ जागांवर विजय मिळवला असून शिंदेंच्या शिवसेनेनं ५७ जागांवर विजय मिळवला आहे. अजित पवारांच्या पक्षाने ४१ जागांवर विजय मिळवला आहे. महायुतीचा मुख्यमंत्री कोण यासंदर्भात केंद्रीय नेतृत्वाशी बोलून आम्ही योग्य तो निर्णय घेऊन असं एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांनी वेळोवेळी सांगितलं आहे.

### आरबीआय गव्हर्नर शक्तिकांत दास यांची तब्येत बिघडली, अपोलो रुग्णालयात दाखल

चेन्नई : आरबीआय गव्हर्नर शक्तिकांत दास यांची प्रकृती अचानक बिघडली आहे. त्यांना चेन्नईतील अपोलो रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे (आरबीआय) गव्हर्नर शक्तीकांत दास यांना चेन्नईतील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. त्यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं. रुग्णालयाकडून तात्काळ कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

शक्तिकांत दास यांना अंडर ऑब्झरवेशन ठेवण्यात आलं आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, आरबीआय गव्हर्नर शक्तीकांत दास यांना चेन्नईतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या ठिक आहे, काळजी करण्यासारखे काही नाही. निवेदनात पुढे म्हटले आहे की आम्ही लवकरच औपचारिक निवेदन जारी करू.

## महेंद्र सिंग धोनीच्या संघात होणार 'रामकृष्णा'चा जयघोष; चेन्नई सुपर किंग्जच्या ताफ्यात चमकणार नाशिकचा हा अष्टपैलू 'हिरा'

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : अष्टपैलू क्रिकेटपटू रामकृष्ण घोषची आगामी आयपीएल २०२५ च्या हंगामासाठी महेंद्र सिंग धोनीच्या बलाढ्य चेन्नई सुपर किंग्ज णएख संघात निवड करण्यात आली आहे. आयपीएल लिलावात ३० लाख या रकमेच्या बेस प्राइसवर चेन्नई सुपर किंग्जनं रामकृष्ण घोषला आपल्या ताफ्यात समाविष्ट करून घेतलं आहे. गेले दोन दिवस आयपीएल २०२५ च्या हंगामासाठी क्रिकेट जगतातील सर्व नामवंत खेळाडूंचा लिलाव झाला. नाशिकच्या सुपुत्राचा महेंद्र सिंग धोनीच्या बलाढ्य संघात समावेश झाल्यानं क्रिकेटपटूंमध्ये मोठा उत्साह संचारल्याचं पाहायला मिळत आहे.

सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत खेळत आहे रामकृष्ण : रामकृष्ण सध्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या सय्यद मुश्ताक अली टी-ट्वेंटी स्पर्धेत ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र संघात खेळत आहे. २०२२ सालीच पदार्पण करत त्यानं महाराष्ट्र संघातर्फे सय्यद मुश्ताक अली टी-ट्वेंटी स्पर्धेत दोन सामने खेळले आहेत. सुरुवातीपासून नाशिकमध्ये क्रिकेटचे धडे गिरवलेला रामकृष्ण घोष यानं विविध वयोगटात नाशिकचं प्रतिनिधित्व केलं. गेली काही वर्षे तो पुण्यात खेळत आहे. मध्यमगती गोलंदाज आणि फलंदाज अशी ओळख असलेला रामकृष्ण घोष चालू हंगामातील विविध स्पर्धात आपल्या अष्टपैलू खेळाची चमक दाखवत आहे.

रणजी ट्रॉफीत ओडिशा विरुद्ध दाखवली अष्टपैलू चमक : चालू हंगामातील नुकत्याच झालेल्या रणजी ट्रॉफी सामन्यात महाराष्ट्र संघातर्फे ओडिशा विरुद्ध रामकृष्णनं अष्टपैलू चमक दाखवली. महाराष्ट्र संघातर्फे पहिल्या डावात तिसऱ्या क्रमांकावर येत रामकृष्णनं १३ चौकारांसह सर्वाधिक ८० धावा केल्या. प्रथम फलंदाजी करत महाराष्ट्र संघानं सर्वबाद १६२ धावा केल्या. उत्तरादाखल ओडिशानं पहिल्या डावात २०० धावा करून आघाडी घेतली. त्यात रामकृष्ण घोषनं आपल्या मध्यमगती गोलंदाजीनं ३ गडी बाद केले. दुसऱ्या डावात महाराष्ट्र संघानं १६६ धावा केल्या, त्यात नवव्या क्रमांकावर खेळून देखील रामकृष्ण घोषनं पुन्हा सर्वाधिक ३९ धावा केल्या. ओडिशानं दुसऱ्या डावात विजयासाठीच्या १२९ धावा ७ गडी गमावून पार करुन तीन गडी राखून विजय मिळवला. दुसऱ्या डावात रामकृष्णनं १ गडी बाद केला. ओडिशाच्या कटक येथील बारबती आंतरराष्ट्रीय क्रिकेट



मैदानावर हा सामना खेळवण्यात आला. रामकृष्ण घोषच्या चेन्नई सुपर किंग्जमध्ये आयपीएल २०२५ साठीच्या या निवडीमुळे नाशिकच्या क्रिकेट वर्तुळात आनंदाचं वातावरण आहे. नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन विनोद शहा, सचिव समीर रकटे आणि सर्वांनी त्याचं अभिनंदन करून भविष्यातील उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

रामकृष्ण घोष हैदराबाद इथं खेळणार सामने : हैद्राबाद इथं होत असलेल्या सय्यद मुश्ताक अली टी-ट्वेंटी स्पर्धेतील, नागालँड आणि केरळवरील विजयानंतर महाराष्ट्राचे बाकी सामने खेळवण्यात येत आहेत. यात २७ नोव्हेंबर – मुंबई, २९ नोव्हेंबर – आंध्र, ३ डिसेंबर – गोवा आणि ५ डिसेंबर – सैन्यदल असे सामने खेळवण्यात येणार आहेत.

पान १ वरून...

### महाविकास आघाडीचे आता

आरोप करण्यापेक्षा ईव्हीएमबाबत जे आक्षेप आहेत किंवा निवडणूक प्रक्रियेत ज्या चुकीच्या बाबी घडल्या ते सर्व पुरावे गोळा करण्याच्या सूचना देखील उमेदवारांना देण्यात आल्या आहेत.

उमेदवारांना २८ तारखे पर्यंत व्हीव्हीपॅट तपासणीसाठी वेळ असल्याने उमेदवारांनी तत्काळ व्हीव्हीपॅट तपासणी करावी अशीही सूचना सर्वच पराभूत उमेदवारांना बैठकीत करण्यात आली आहे. त्यासंदर्भातील पत्राचा एक नमूना देखील शेअर करण्यात आला आहे. राज्य पातळीवर ज्या प्रकारे या लढाईला सुरूवात करण्यात आली, त्याच प्रमाणे इंडिया आघाडी देखील लढाई लढणार असल्याची माहिती शरद पवारांनी उमेदवारांना दिली आहे. तर, आता मागे हटायच नाही, लढायचं, असा ऊर्जात्मक संदेशही शरद पवारांनी पराभूत उमेदवाराना दिला आहे.त्यामुळे, ईव्हीएमविरोधातील लढाई आता तीव्र होणार असल्याचे दिसून येते.

ठाकरेंच्या शिवसेनेचे पराभूत उमेदवार सुधाकर भिका बडगुजर यांनी नाशिक जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ईव्हीएमबाबत तक्रार नोंदवली आहे. वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते कि १२५- विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा निकाल दि. २३/११/२०२४ रोजी जाहीर केला आहे. आपण दिलेल्या निकालावरती संशय निर्माण झालेला आहे. त्यामुळे आक्षेप नोंदवित आहोत.२६-०४-२०२४ रोजी सुप्रीम कोर्टाचे आदेशानुसार निवडणुक निकालानंतरही ७ दिवसाच्या आतमध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या पडताळणीची मागणी दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे उमेदवार मागणी करू शकतात. त्यामुळे निवडणुक प्रक्रिया व मतमोजणी प्रक्रिया संशयास्पद वाटत असल्याने. सोबत मतदान केंद्राची यादी जोडलेली असुन त्यानुसार ईव्हीएम मायक्रो कंट्रोलर व व्हीव्हीपॅटची पडताळणी करून निर्माण झालेला संशय दूर करावा हि विनंती, असे पत्र बडगुजर यांनी निवडणूक आयोगाला लिहिले आहे.

### सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना पुन्हा मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टाने स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. ईव्हीएमला विरोध करणारी याचिका सुप्रीम कोर्टानं फेटाळली. तसेच, जिंकलं की तुम्हाला ईव्हीएम चांगले वाटतात आणि निवडणूक हरलं की तुम्हाला ईव्हीएममध्ये छेडछाड दिसते, अशा शब्दात सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यांना झापलं आहे. डॉ. के.ए. पॉल यांनी ही याचिका केल होती. मात्र, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती पी.बी. वराळे यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळली आहे. त्यामुळे, ईव्हीएमच्या घोळावरुन संशय व्यक्त केला जात असल्याच्या आरोपांना आता काहीही अर्थ उरला नाही.

सलील देशमुख यांचा आरोप

आम्हाला आमच्या मतदारसंघात चांगला प्रतिसाद मिळाला होता, पण आम्हाला या निवडणूकीत प्रतिसाद मिळाला नाही. आम्हाला पराभव सहन करावा लागला आहे, पण आमच्या मतदारसंघात देखील याबाबत आश्र्चर्य वाटतं आहे. सर्वसामन्यांना याबाबत आश्र्चर्य वाटतं आहे. तुतारीच्या ठिकाणी ट्रम्पेट देता हे चुकीचं आहे, ईव्हीएमला जर विरोध होतोय तर आयोगाकडून ईव्हीएमचा हट्ट का धरला जातोय,असा सवाल अनिल देशमुख यांचे पुत्र आणि उमेदवार सलील देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

कायदेशीर लढाईसाठी समिती गठीत

राष्ट्रवादीच्या बैठकीत सर्वच उमेदवार यांनी आज सांगितले की, मतदार भेटतात, अनेक गावात मतदान झालेलं नाही असं दिसते. पण आम्ही मतदान केले, काही आकड्यांवर साशंकता व्यक्त होत असल्याचं मतदार सांगत आहेत. मतदान आणि मतदार यात वाढ असल्याची देखील चर्चा आहे, असेही रोहित पवार यांनी म्हटले. तसेच, कायदेशीर पुढे काय भूमिका घ्यायची, त्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज संस्थेत पुन्हा हेच होणार असेल तर कसं होईल, गुलामगिरी स्वीकाराची वेळ येईल, असेही रोहित पवार यांनी म्हटले.

रोहित पवारांचा राम शिंदेंवर आरोप

समोरील लोकांनी मताला तीन हजार दिले, वीस तीस कोटी खर्च केल्याचा आरोपही रोहित पवार यांनी भाजप नेते राम शिंदे यांच्यावर केला आहे. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले, तरी लाडक्या खुर्चीसाठी वाद सुरू असून दिलेल्या आश्र्वासनांवर काहीच होत नाही, असा टोलाही रोहित पवारांनी लगावला.

# राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या आयुर्वेद निसर्ग चाचणीने प्रकृती परिक्षण अभियानाला देशात सुरुवात !

## केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले राष्ट्रपतीचे स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या आयुर्वेद निसर्ग चाचणीने देशात आजपासून प्रकृति परीक्षण अभियानाला सुरुवात झाली आहे या प्रसंगी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते आयुर्वेद निसर्ग चाचणी अभियान पुढील एक महिना संपूर्ण देशात चालणार आहे.

आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार देशामध्ये होण्याच्या दृष्टीकोनातून हर घर आयुर्वेद निसर्ग चाचणी (प्रकृती परिक्षण) अभियान देशात राबविण्याचा संकल्प केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव हाती घेतला आहे भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून हर घर आयुर्वेद अंतर्गत आयुर्वेद निसर्ग





चाचणी (प्रकृती परिक्षण) अभियानला आज पासून संपूर्ण देशात राबविल्या जाणार आहे आहे या अभियानाची सुरुवात राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या आयुर्वेद निसर्ग चाचणीने झाली यावेळी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते हर घर आयुर्वेद हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प या अभियानातून साकारल्या जाणार आहे हे अभियान २६ नोव्हेंबर पासून संपूर्ण देशात सुरू झाले आहेत पुढील एक महिना हे अभियान देशात राबविल्या जाणार असून अभियानाची सांगता २५ डिसेंबरला माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंती दिनी होणार आहे या अभियानामध्ये चार लाख पेक्षा जास्त आयुर्वेदचे शिक्षण घेणारे विद्यार्थी डॉक्टर्स सहभागी होणार आहेत या अभियानाच्या माध्यमातून एक महिन्यांमध्ये एक करोड नागरिकांची आयुर्वेद निसर्ग चाचणी (प्रकृती परिक्षण) करण्याची उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहेत . हे परीक्षण करताना आधुनिक तंत्रज्ञानाचाही उपयोग घेण्यात आला आहे या अभियानामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुर्वेद चाचणी अहवालानुसार मोबाईलवर आरोग्य संदर्भातील माहिती देण्यात येणार आहे देशातील हा अभिनव प्रयोग आयुर्वेद निसर्ग उपचारासाठी नवीन दालन उपलब्ध करून देणारा ठरणार आहे अशी अपेक्षा केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी या अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केली आहे

## सहलीला जाणाऱ्या बसचा भीषण अपघात; बसमधील अनेक विद्यार्थी जखमी

**नागपूर/प्रतिनिधी :** विद्यार्थांना सहलीला घेऊन जाणाऱ्या बसचा भीषण अपघात झाला आहे. नागपूर-वर्धा जिल्ह्याच्या सीमेवरील पेंढरी गावाजवळ हा अपघात झाल्याची माहिती समोर आली. अपघातग्रस्त बसमध्ये नागपूर इथल्या सरस्वती शाळेतील विद्यार्थी होते, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

सरस्वती शाळेतील विद्यार्थ्यांची सहल आज वर्धा जिल्ह्यातील बोरधरण इथं जात होती. यावेळी पेंढरी गावाजवळ बसला अपघात झाला. या अपघातात एका विद्यार्थिनीचा दुर्दवी मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पुढं आली आहे, मात्र त्याला कोणताही दुजोरा अद्याप मिळाला नाही. आज सकाळी एकूण ५ बस विद्यार्थ्यांना घेऊन बोरधरणच्या दिशेनं जाताना चार बस पुढं निघाल्या. तर शेवटी असलेल्या बसच्या चालकाचं बसवरील नियंत्रण सुटल्यानं बसला अपघात झाला. या घटनेत अनेक विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना नागपूरच्या मिहान येथील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर एका विद्यार्थिनीचा यात दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती पुढं येत आहे. हिंगणा पोलीस घटनास्थळी दाखल झाली असून बचावकार्य युद्ध पातळीवर सुरू आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## बालक दत्तक विधानासाठी अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** :बालक दत्तक विधानासाठी अर्ज आमंत्रित करण्यात आले आहे. बालक दत्तक घेण्यासाठी इच्छूकांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे.

बाल न्याय मुलांची (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित २०२१ व दत्तक नियमावली २०२२ नुसार भारतात दत्तक विधान प्रक्रिया राबविल्या जाते.

**बाळ दत्तक कोण घेऊ शकतो-** भावी दत्तक माता हे शारीरिक, मानसिक, भावनात्मक आणि आर्थिक स्वरुपात सक्षम असणे आवश्यक आहे. या दत्तक विधान प्रक्रियेसाठी दोन्ही पती-पत्नी यांची सहमती असणे आवश्यक आहे. एकल महिला हि दत्तकसाठी बालक किंवा बालिका निवडु शकते, एकल पुरुष फक्त बालकाची निवड करु शकतो.

**बाळ दत्तक घेण्यासाठीची पालकांची वयोमर्यादा-** दोन वर्षाच्या आतील बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची संयुक्तिक कमाल वयोमर्यादा ८५ वर्ष, तर भावी एकल माता पिता यांची कमाल वयोमर्यादा ४० वर्ष, दोन ते चार वर्षापर्यंतचे बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची संयुक्तिक कमाल वयोमर्यादा ९० वर्ष, तर भावी एकल माता व पिता यांची कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष, चार ते आठ वर्षापर्यंतचे बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची कमाल वयोमर्यादा संयुक्तिक १०० वर्ष, तर भावी एकल माता व पिता यांची कमाल वयोमर्यादा ५० वर्ष, आठ ते १८ वर्षापर्यंतचे बालक असल्यास भावी दत्तक माता पिता यांची संयुक्तिक कमाल वयोमर्यादा ११० वर्ष, तर एकल भावी माता व पिता यांची कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष असावी.

**दत्तक विधानासाठी अर्ज कुठे करावा-** दत्तक विधानामार्फत बाळ घेऊ इच्छिणाऱ्या भावी माता पिता यांनी https://cara.wcd.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर आपला अर्ज करावा. तसेच दत्तक विधानाबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, सुवर्ण नगर, मुट्ठे ले आऊट, बस स्टँड मागे, डॉ.जोशी हॉस्पिटल यांचे शेजारी, बुलढाणा येथे भेट देऊ शकता व यशोधाम, दि लव्ह ट्रस्ट, खामगाव रोड, सुंदरखेड, बुलढाणा या विशेष दत्तक संस्थेस भेट देऊन माहिती प्राप्त करुण घेऊ शकता.

**दत्तक विधानासाठी अर्ज केल्यानंतरची प्रक्रिया -** दत्तक विधानासाठी अर्ज केल्यानंतर गृह अध्ययन अहवालासाठी अर्जदारांना निकटची दत्तक संस्था निवडावी लागते, सदर अर्ज केल्यानंतर गृह अध्ययन अहवाल करण्यासाठी सदर संस्थेने ६० दिवसाच्याआत अर्जदारांच्या घरी जाऊन अहवाल तयार करणे बंधनकारक आहे. सदर गृह अध्ययन अहवाल हा तीन वर्षासाठी लागू राहील.

दत्तक विधान संस्थेमार्फत गृह अध्ययन अहवाल कारा पोर्टलवर अपलोड केल्यानंतर एक महिन्यानंतर आपल्याला आपल्या पसंतीनुसार बाळ दिसने सुरु होईल. ज्यामध्ये बाळाचा फोटो, मेडीकल रिपोर्ट, बालक अभ्यास अहवाल इत्यादी माहिती असेल. जर एखादे बाळ आपणास पसंद पडल्यास सदर बालकास ४८ तासाच्या आत कारा पोर्टलवरुन आरक्षित करावे लागेल. सदर भावी माता पितांची दत्तक विधान समिती बैठकीत साक्षात्कार व आकलन केल्यानंतर व भावी माता पिता हे बालकासाठी योग्य वाटल्यास बालक पालकांच्या ताब्यात तात्पुरत्या स्वरुपात प्रि फोस्टर केअर अंतर्गत दिले जाते व संस्थेमार्फत बालक व पालकांची नस्ती तयार करुन न्यायालयामार्फत पालकांना दत्तक आदेश दिल्या जातो. अशी माहिती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांनी दिली आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान उद्देशिकेचे वाचन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** संविधानिक मुल्यांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने आज सकाळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथे भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ, उपजिल्हाधिकारी सुरेश खरात यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताने संविधान स्वीकारले. या घटनेला आज ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. भारतीय संविधान व त्यातील मूल्य, हक्क-अधिकार व कलम यासंबंधी अपर जिल्हाधिकारी श्री. शेलार यांनी उपस्थितांना माहिती दिली.

## आधी मिळाला नाही विकत घेणार, मग अचानक या संघात सामील झाला अर्जुन तेंडुलकर

**मुंबई/प्रतिनिधी** : आयपीएल २०२५ चा लिलाव अर्जुन तेंडुलकरसाठी खूप विचित्र ठरला. आयपीएल लिलावात अर्जुन तेंडुलकरचे नाव समोर आले, तेव्हा कोणत्याही संघाने त्याच्यावर सट्टा लावला नाही. पण त्यानंतर आयपीएल लिलावाच्या शेवटच्या फेरीत अर्जुनला अचानक विकत घेण्यात आले. सचिनचा मुलगा अर्जुन तेंडुलकरसाठी मुंबईने पुन्हा बोली लावली. अर्जुनला मुंबई इंडियन्सने सलग चौथ्यांदा विकत घेतले आहे. अर्जुन तेंडुलकरने आयपीएलमध्ये ५ सामने खेळले असून त्यात ३ विकेट घेतल्या आहेत.अर्जुन तेंडुलकरची आयपीएलमधील कामगिरी काही विशेष झाली नाही, पण तरीही तो महागडा ठरला आहे. अर्जुन तेंडुलकरने आयपीएलच्या पाच सामन्यांमध्ये १० च्या इकॉनॉमी रेटने धावा दिल्या होत्या. हे लक्षात घेता मुंबईने त्याला या मोसमाच्या सुरुवातीला खरेदी न करण्याची शक्यता होती. अर्जुनच्या ऊ२० कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले, तर या खेळाडूने २३ ऊ२० सामन्यांमध्ये २६ विकेट घेतल्या आहेत आणि त्याचा इकॉनॉमी रेट प्रति ओव्हर ८.७० आहे. अर्जुन सध्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये गोव्याकडून खेळत आहे, जिथे त्याने सर्व्हिसेसविरुद्ध चांगली कामगिरी केली. अर्जुनने या सामन्यात ३ षटकात केवळ १९ धावा दिल्या. मात्र, मुंबईविरुद्ध त्याचा वाईट पराभव झाला, जिथे त्याने ४ षटकांत ४८ धावा दिल्या.

# लैंगिक अत्याचारग्रस्त मुलांच्या मदतीसाठी सहायक व्यक्तींची गरज; पात्र व्यक्तींनी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यात लैंगिक अपराधापासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्यांतर्गत लैंगिक शोषण झालेल्या किंवा अत्याचाराला बळी पडलेल्या मुलांना मदत करण्यासाठी सहाय्यक व्यक्तींची नियुक्ती करण्यात येणार असून त्यासाठी बालकांच्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी अर्ज सादर करावा असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे.

लैंगिक अपराधापासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) हा कायदा बाल लैंगिक अत्याचाराशी संबंधित प्रकरणांना हाताळण्यासाठी तयार करण्यात आला आहे. या कायद्यात १८ वर्षाखालील बालकांचे लैंगिक शोषण, पोर्नोग्राफीपासून संरक्षणासाठी कायदेशीर तरतूद करण्यात आले आहे. लैंगिक शोषण झालेल्या किंवा अत्याचाराला बळी पडलेल्या मुलांना आधार देण्याची जबाबदारी संपुर्ण समुदायाने स्वीकारली पाहिजे. यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी पुढे येवून अशा बालकांना सहाय्यक व्यक्ती म्हणुन मदत करणे आवश्यक आहे.

त्यामुळे बालकांच्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी अर्ज सादर करावा. अर्जदारास अटी व शर्ती लागु राहतील.

**सहाय्यक व्यक्तीसाठी पात्रता :** सामाजिक कार्य किंवा समाजशस्त्र किंवा मानसशास्त्र किंवा बाल विकास या विषयात पदव्युत्तर पदवी घेतलेली कोणतीही व्यक्ती किंवा बालशिक्षण आणि विकास संरक्षण विषयांमध्ये किमान तीन वर्षाचा अनुभव असलेली पदवीधर व्यक्ती अर्ज करू शकतात. तसेच सहाय्यक व्यक्ती म्हणून काम करण्यास पात्र असलेल्या संस्थेमध्ये बाल हक्क संरक्षणाच्या क्षेत्रात सक्रियपणे गुंतलेली संस्था देखील पात्र ठरु शकते. याव्यतिरिक्त मुलांच्या देखरेखीसाठी जबाबदार असलेल्या बालगृह किंवा निवारागृहाशी संबंधित अधिकारी देखील सहाय्यक व्यक्ती म्हणून अर्ज करण्यास पात्र असतील.




**अर्ज कुठे करायचा :** इच्छुक उमेदवारांनी अर्ज हा जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बस स्टॅंड मागे, डॉ जोशी हॉस्पिटल जवळ, सुवर्ण नगर, बुलडाणा येथे अर्ज करावा.

अर्जानंतरची प्रक्रिया : अर्ज कार्यालयास प्राप्त होताच अर्जाची पडताळणी ही जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचे मार्फत पूर्ण झाल्यानंतर पात्र उमेदवारांना निवड समिती समक्ष वैयक्तिक संवादाच्या आधारे मुल्यमापन करुन सहाय्यक व्यक्तींच्या पदासाठी शिफारस करेल.

**मासिक भत्ता :** लैंगिक उपराधापासुन मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा, २०१२ नुसार बालकाला मदत करण्याच्या उद्देशाने गुंतलेल्या सहाय्यक व्यक्तीला रुग्णालये, बाल कल्याण समिती, पोलिस ठणे, बालसंगोपन संस्था, पीडितचे कुटुंब, शैक्षणिक संस्था, न्यायालय, सरकारी विभाग, बँका इ. ठिकाणी केलेल्या कामकाजाच्या दिवसांच्या संख्येनुसार किंवा प्रत्यक्ष भेटीद्वारे कामाचा मोबदला निर्धारित केला जाईल. परंतु ज्याची गणना किमान वेतन कायदा, १९४८ अंतर्गत कुशल कामगारासाठी निर्धारित केलेल्या रकमेच्या आधारावर पूर्वनियोजित पद्धतीने अदा केली जाईल. परंतु जर एखाद्या व्यक्तीची सहाय्यक व्यक्ती म्हणुन निवड केलेली असेल व त्याला कोणत्याही प्रकरणासाठी नियुक्त केलेले नसेल किंवा सदर सहाय्यक व्यक्ती मुलाला आधार देत नसेल तर त्याला/तिला कोणताही मोबदला मिळणार नाही.

सहाय्यक व्यक्ती म्हणून काम करण्याची इच्छा असणारे उमेदवारांनी लवकरात लवकर आपला अर्ज सादर करावा. तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विविध वृत्त...

### गोंदियाच्या सडक अर्जुनी येथील न्यायालयात ११०० दिवे लावून दिवाळी प्रमाणे साजरा केला संविधान दिवस



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** २६ नोव्हेंबर रोजी संपूर्ण देशभरात संविधान दिवस साजरा करण्यात आला.. अश्यातच गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी येथील न्यायालय परिसरामध्ये आज रात्री ११०० दिवे लावून संविधान दिवस दिवाळी प्रमाणे साजरा करण्यात आला.. त्याच प्रमाणे मूळ संविधानातील २२ भागांचे रेखाटलेले चित्र देखाव्यांच्या माध्यमातून दाखविण्याचे प्रयत्न केला आहे. त्यात जे जल चित्र रेखाटले आहेत, त्याचा काय इतिहास आहे, किती मोल आहे, आणि त्या जल चित्राचे संविधानात किती महत्व आहे हे दाखविण्याचा प्रयत्न या देखाव्या द्वारे दाखविण्यात आले आहे. तर संविधान कश्या प्रकारे तयार करण्यात आले, त्याचे प्रती नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी संविधानाचे महत्त्व नागरिकांना कळावे ह्या उदात्त हेतूने ११०० दिवे लावून संविधान दिवस साजरा केल्याचा उपक्रम आम्ही राबविला अशी माहिती सडक अर्जुनी न्यायालयाचे तालुका न्यायाधीश विक्रम आव्हाड यांनी दिली... तर ज्याप्रमाणे आपण आपले अनेक सण उत्सव साजरे करतो त्याच पद्धतीने प्रत्येकाने संविधान दिवस साजरा करायला पाहिजे असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले...

### अमरावतीत जलसंपदा विभागाच्यावतीने संविधान दिनानिमित्त सामुहिक संविधान वाचन कार्यक्रमाचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीच्या जलसंपदा विभागाच्या वतीने संविधान दिनानिमित्त संविधान वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भारताचे संविधान उद्देशिकेचे वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये संविधान अभ्यासक डॉ. सुभाष गवई यांचे व्याख्यान झाले व अधिकाऱ्यांमध्ये संविधान बद्दल जागृती करण्यात आली. संविधानाचे महत्त्व समजून सांगण्यात आले.

### समाज कल्याण कार्यालयात संविधान दिन साजरा




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयात व कार्यालयाच्या अधिनस्त समाजकार्य महाविद्यालय, तसेच अनुसूचित मुलामुलींच्यां शासकीय निवासी शाळा व मागासवर्गीय मुलामुलींचे शासकीय वसतिगृह येथे संविधान दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये संविधान प्रस्ताविकाचे वाचन करणे, संविधानाबाबत जनजागृती, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये इत्यांदी विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आले होते.

जिल्हास्तरावरील संविधान दिन कार्यक्रम हा महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय येळगांव व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमाने समाजकार्य महाविद्यालय येळगांव येथे आयोजित करून साजरा करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी रॅली काढण्यात आली. कलापथकाच्या माध्यमातून संविधानाबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी सर्व अधिकारी-कर्मचारी, नागरीक, महिला, विद्यार्थी यांचेसह एकत्रित संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.हरिश साखरे हे होते. तर नंदकुमार गायकवाड, सुरेश जाधव, संदिप कपले, रणजित सोळंके, गणेश कपले आदींची प्रमुख उपस्थिती होते.

या कार्यक्रमांचे प्रास्तविक सतिश बाहेकर यांनी केले. तर मुख्य मार्गदर्शक म्हणून संदिप कपले, नंदकुमार गायकवाड यांनी आपल्या व्याख्यानामध्ये संविधान दिनाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.अविनाश गेडाम यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय येळगांव व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय बुलढाणा येथील कर्मचाऱ्यांनी मोलाची भुमीका बजावली.